दैनिक
छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर

मराठवाडा पत्र

शनिवार
१.२.२०२५
वर्षे : ४ अंक : २९५
किंमत : ३ रू. पाने : ४

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955

पंकजांसाठी गडाची दारं बंद करणाऱ्या,धनंजय मुंडे यांची बाजू घेणाऱ्या

नामदेवशास्त्रींवर प्रकाश महाजन यांचा निशाणा

मुंबई, (वृत्तसेवा):-भगवानगडाचे महंत नोमदेवशास्त्री महाराज यांनी धनंजय मुंडे यांच्यामागे गडाची ताकद उभी करून राजकीय पक्षाच्या नेत्यांना सूचक संदेश दिला आहे. नामदेव शास्त्री यांनी उघडपणे राजकीय भूमिका घेतल्याने संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांचे मामा, मनसेचे नेते प्रकाश महाजन यांनी नामदेव शास्त्री यांच्या जुन्या भूमिकेची आठवण करून देत धनंजय मुंडे यांना दिलेल्या पाठिंब्यावरून निशाणा साधला आहे. धनंजय मुंडे नात्याने माझा भाचा आहे. त्यांना पाठिंबा देण्याची भूमिका नामदेव शास्त्री यांनी घेतली. स्वत:ला न्यायाचार्य म्हणून घेणाऱ्या शास्त्रींनी ज्यावेळी पंकजाला गडाची नितांत गरज होती, त्यावेळी मात्र आश्रय देण्यास नकार दिला होता, अशी आठवण करून देत धनंजय मुंडे यांची बाजू घेणाऱ्या नामदेवशास्त्रींवर प्रकाश महाजन यांनी निशाणा साधला आहे.

पंकजांसाठी एक न्याय,धनंजय मुंडे यांच्यासाठी वेगळी भूमिका

अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात भगवानबाबांनी गडाची स्थापना केल्यावर वंजारी समाजाला एक धार्मिक स्थान मिळाले. काही वर्षांनी गोपीनाथ मुंडे यांनी गडावर दसरा मेळावा सुरू केला. गोपीनाथ मुंडे यांच्या रुपाने दसरा मेळाव्याची परंपरा कित्येक वर्षे सुरू होती. त्यांच्या निधनानंतर पंकजा मुंडे त्यांचा वारसा चालविण्यासाठी दसरा मेळावा घेऊ लागल्या. मात्र भगवानगडाचा वापर राजकीय कारणासाठी होऊ देणार नाही, अशी भूमिका त्यावेळी नामदेव शास्त्री यांनी घेतली. त्यावेळी पंकजा मुंडे आणि नामदेव शास्त्री यांच्यात वितुष्ट आलेले संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले. पंकजांसाठी भगवानगडाचा राजकीय वापर नको अशी भूमिका घेणाऱ्या महाराजांनी यावेळी मात्र धनंजय मुंडे यांच्यामागे भगवानगडाची ताकद उभी केली.

पंकजा मुंडे यांच्या वडिलांचे म्हणजे गोपीनाथ मुंडे यांचे निधन झाले होते. त्यावेळी गडावर राजकीय मेळावा घ्यायचा नाही, असे सांगून पंकजा मुंडे यांच्यासाठी नामदेव शास्त्री यांनी गडाची दारे बंद केली. ज्यावेळी गडाने पंकजा मुंडे यांना अंतर दिले, त्यावेळी ▶▶पान २ वर

बीडमध्ये वाळु माफियांना सहकार्य करणाऱ्या पोलिसांना झटका

दोन पोलिस कर्मचारी निलंबित, पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांची कारवाई

बीड, (प्रतिनिधी):- बीडचे नवनियुक्त पोलिस अधीक्षक नवनीत कांवत हे चांगलेच ॲक्शन मोडमध्ये आल्याचे दिसत आहे. अवैध वाळू उपसा केल्या प्रकरणी आरोपींशी साटे लोटे करणाऱ्या बीडच्या गेवराई पोलिस ठाण्यातील दोन पोलिस कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. सहाय्यक फौजदार बलराम सुतार आणि पोलिस हवालदार अशोक हंबर्डे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणातील अधिकची माहिती अशी की, सहाय्यक फौजदार बलराम सुतार आणि पोलिस हवालदार अशोक हंबर्डे यांना वाळूच्या दोन ट्रॅक्टरवर कारवाईचे आदेश देण्यात आले होते तसेच वाळूसह गाडी देखील ताब्यात घेण्यास सांगितले होते. मात्र, यांनी वाळूसह गाडी ताब्यात न घेता केवळ वाहन ठाण्यात आणून लावले. तसेच गुन्हा दाखल करण्यास देखील विलंब केला. हा प्रकार म्हणजे आरोपींना सहकार्य करण्याचा होता. यामुळे पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांनी बलराम सुतार आणि अशोक हंबर्डे या दोन्ही कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. बीड येथील मस्साजोग सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली होती. या घटनेचे तीव्र पडसाद महाराष्ट्रात उमटू लागले. या दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिल्ह्यातील पोलिस अधीक्षकांची बदली करत नवनीत कांवत यांची बीडच्या पोलिस अधीक्षक पदावर नियुक्ती केली. बीडमध्ये अवैध वाळू, राख तसेच खंडणी असे अनेक गुन्हे उघडकीस येत आहेत. त्यातच वाळू माफियाचा मुद्दा चांगलाच चर्चेत असताना अवैध वाळू तस्करी करणाऱ्यांना दोन पोलिस कर्मचाऱ्यांना सहकार्य केल्याचे निदर्शनास आल्यावर पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे.

शेतकऱ्यांसाठी आनंदवार्ता

सोयाबीन खरेदीसाठी नका लावू लांब रांगा,इतक्या दिवसांची मुदत वाढ

मुंबई, (वृत्तसेवा):-सोयाबीन शेतकर्यांसाठी आनंदवार्ता येऊन धडकली आहे. आज सोयाबीन खरेदीची मुदत संपत असल्याने शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर एकच गर्दी केली होती. आता सरकारने सोयाबीन खरेदीची मुदत वाढवली आहे. सोयाबीन शेतकर्यांना सरकारने मोठा दिलासा दिला आहे. सोयाबीन खरेदीची मुदत आज संपणार असल्याने खरेदी केंद्रांवर एकच गर्दी उसळली होती. आता केंद्र सरकारने सोयाबीन खरेदीची मुदत वाढवली आहे. सोयाबीन शेतकर्यांना सरकारने मोठा दिलासा दिला आहे. सोयाबीन खरेदीची मुदत आज संपणार असल्याने खरेदी केंद्रांवर एकच गर्दी उसळली होती. आता केंद्र सरकारने सोयाबीन खरेदीची मुदत वाढवली आहे. सोयाबीन खरेदीला सात दिवसांची मुदत वाढ देण्यात आली आहे. ७ फेब्रुवारीपर्यंत सोयाबीन खरेदीची मुदत वाढली आहे. पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांची भेट घेतल्यानंतर आता मुदत वाढ मिळाली. सोयाबीन खरेदीला सात दिवसांची मुदत वाढ देण्यात आली आहे. ७ फेब्रुवारीपर्यंत सोयाबीन खरेदीची मुदत वाढली आहे. पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांची भेट घेतल्यानंतर आता मुदत वाढ मिळाली. सोयाबीनची खरेदी राज्यात मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. आज ३१ तारीख ही खरेदीची शेवटची तारीख होती. आम्ही कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांची भेट घेवून ती मुदत वाढवण्यासाठी मागणी केली होती. आमची विनंती मान्य करून पुढील ७ दिवसांची वाढ दिली आहे, अशी माहिती जयकुमार रावल यांनी दिली आहे. सोयाबीनची खरेदी राज्यात मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. आज ३१ तारीख ही खरेदीची शेवटची तारीख होती. आम्ही कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांची भेट घेवून ती मुदत वाढवण्यासाठी मागणी केली होती. आमची विनंती मान्य करून पुढील ७ दिवसांची वाढ दिली आहे, अशी माहिती जयकुमार रावल यांनी दिली आहे. शेतकऱ्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे, शेतकऱ्यांना या ▶▶पान २ वर

धनंजय मुंडे खंडणीवर जगणारे नेते नाहीत!

महंत नामदेव शास्त्री मुंडेंच्या पाठीशी!

बीड, (प्रतिनिधी):-मसाजोग हत्या प्रकरणामुळे वादात सापडलेले राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांना मोठा दिलासा मिळाला आहे. श्री क्षेत्र भगवान गडचे महंत नामदेव शास्त्री यांनी भक्कमपणे भगवानगड मुंडेंच्या पाठीशी असल्याचे म्हटले आहे. धनंजय हा काही खंडणी वर जगणारा नेता नाही असेही त्यांनी म्हटले आहे.ङ्गबीड जिल्ह्यातील मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या झाली. या हात्येमागे वाल्मिक कराड आणि त्यांची गँग असल्याचे समोर आले. कराड व इतरांना अटक झाली. दरम्यान या प्रकरणात गेल्या पन्नास दिवसापासून राज्याचे मंत्री धनंजय मुंडे हे महायुती

आणि महाविकास आघाडी मधील आमदारांच्या टार्गेट वर आहेत.ङ्गविशेषतः आ सुरेश धस, आ संदीप क्षीरसागर, आ प्रकाश सोळंके, आ जितेंद्र आव्हाड, खा बजरंग सोनवणे यांनी मुंडे यांच्या राजीनाम्या साठी दबाव वाढवला आहे. अंजली दमानिया, तृप्ती देसाई यांनीही त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.ङ्गया सगळ्या पार्श्वभूमीवर ▶▶पान २ वर

एसबीआय बँकेतून दोन लाखांची रोकड लंपास

नगर परिषदेची रक्कम चोरीला

अंबाजोगाई, (प्रतिनिधी):- शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेतून अज्ञात चोरट्याने दोन लाख रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना घडली आहे. सदर रक्कम अंबाजोगाई नगर परिषदेची होती. मंगळवारी (दि. ३०) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास नगर परिषदेतील कर्मचारी भिकाजी दामोदर शिंदे चालानची रक्कम बँकेत भरण्यासाठी गेले होते. त्यांनी पैशांची बॅग बँकेतील टेबलावर ठेवली होती. याचवेळी अज्ञात चोरट्याने शिंदे यांची नजर चुकवत बॅग लंपास केली. चोरी झाल्यानंतर शिंदे यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. सीसीटीव्ही फुटेज मिळाले नाही! पोलिसांनी बँकेत येऊन तपास सुरू केला. मात्र, बँकेतील सीसीटीव्हीच्या केबल उंदराने कुरतडल्याने फुटेज मिळू शकले नाही. त्यामुळे चोरट्याचा तपास अधिक कठीण झाला आहे. या घटनेमुळे बँकेच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी माहिती असल्यास तत्काळ संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

बीड : ॲड. एस. आर. रूचके यांची भारत सरकार नोटरीपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करून शुभेच्छा देताना ॲड. सुधीर जाधव, ॲड. विवेक डोके, ॲड. सतीश गाडे, ॲड. राजेश जाधव, ॲड. रावसाहेब रुचके, ॲड. गायकवाड मॅडम, ॲड. छाया वाघमारे, दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे आदी छाया चित्रात दिसत आहेत.

बाजारात कपडे काढून फिरणाऱ्यांचे म्हणणे आहे की ते नैतिक आहेत

खा.सोनवणेंचा धनंजय मुंडे यांना टोला

बीड, (प्रतिनिधी):- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर तिखट शब्दांत हल्ला चढवला आहे. सद्यस्थितीत बाजारात कपडे काढून फिरणाऱ्यांचे म्हणणे आहे की, ते नैतिक आहेत, असे ते आपला संतप्त सूर आळवत म्हणालेत. या प्रकरणी धनंजय मुंडे यांची बाजू घेणारे भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री यांच्याविषयी पंकजा मुंडे यांनी केलेल्या एका विधानाचीही आठवण करून दिली. नामदेवशास्त्री यांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणात उघडपणे मंत्री धनंजय मुंडे यांची बाजू घेतली आहे. त्यावर संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर बजरंग सोनवणे यांनी उपरोक्त विधान केले आहे. सोनवणे सध्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने दिल्ली दौऱ्यावर आहेत. ते तिथे शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, पंकजा मुंडे याप्रवी नामदेव शास्त्रींविषयी काय म्हणाल्या होत्या हे तपासून पाहा. त्यांचे विधान प्रचंड व्हायरल झाला होते. त्यामुळे गड मुंडेंच्या पाठिशी उभा राहतो. पण ज्याचा खून आझाला, ज्याला हाल – हाल करून मारले त्याच्यासाठी ▶▶पान २ वर

मेजॉरिटीची मौनी ममता!

एखाद्या विषयाची किती हवा करायची याचा काही एक विवेक असावा लागतो. हा विषय वैयक्तिक श्रद्धेसारखा भावनिक असेल आणि त्याची हवा तयार करणारे सत्ताधारी असतील तर या विवेकाची गरज अधिक. भावनेस हात घालणे सोपे. बुद्धिगम्य वैज्ञानिकता मनी रुजवणे कित्येक पटींनी अवघड. हे सत्य लक्षात घेतल्यास विद्यामान राज्यकर्त्यांनी प्रयागराज येथील 'महाकुंभ'ची वातावरण निर्मिती केली ती किती घातक होती हे बुधवार पहाटेच्या चेंगराचेंगरीच्या घटनेवरून समजावे. जे झाले ते निर्विवाद दु:खदायक. इतके की प्रत्यक्ष किती जणांचे आयुष्य शब्दश: गंगार्पणमस्तु झाले हे सांगण्यासही दिवसभरात कोणी धजावत नव्हता. 'बीबीसी'सारख्या वृत्तसेवेनुसार 'जखमीं'स दाखल केलेल्या रुग्णालयात माध्यमकर्मींस मज्जाव होता. तो का न कळे. कारण गंगाकिनाऱ्यास प्रेतांच्या ढिगाऱ्यांचे नावीन्य नाही. कोविडकाळात देशाने ते पाहिले, त्या तुलनेत आजचे (बहुधा) तीसेक जणांचे मृत्यू कमी! तेव्हा याप्रकरणी इतकी गुप्तता बाळगण्याचे काही कारण नव्हते. कदाचित दिल्ली विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर या प्रकरणाचा बभ्रा झाल्यास राजधानीचा हातातोंडाशी आलेला घास जायचा, याचीही भीती असेल. संकट कितीही गहिरे, तीव्र असो. निवडणूक विजय त्या सगळ्यापेक्षा अधिक महत्त्वाचा! असो. जे झाले त्याबाबत शोक व्यक्त करून आणि मृतात्म्यांस सद्गती मिळो अशी इच्छाही व्यक्त करून काही मुद्द्यांचा ऊहापोह व्हायला हवा. उदाहरणार्थ या कुंभमेळ्यास हजर राहिलेल्यांची संख्या. कोणी १० कोटी सांगतो, कोणी १२ कोटी वा कोणी आणखी काही. या संख्येच्या सत्यासत्यतेबाबत चर्चा करायची नाही असे ठरवले तरी भाव महत्त्वाचा की भाविकांची संख्या हा प्रश्न कोणालाच पडू नये? महाभारतात केवळ संख्येच्या प्रेमात पडून कृष्णाचे काही अक्षौहिणी सैन्य मागणारे कौरव आणि भक्तिभावाने कृष्णाची साथ मागणारे पांडव यांच्या लढाईत काय झाले याचे स्मरण या प्रसंगी अनाठायी ठरणार नाही. सगळ्यात मोठे, सगळ्यात भव्य, सर्वाधिक संख्या, पहिल्या तिनांत इत्यादी दावे करणाऱ्यांच्या मनात स्वत:विषयी न्यूनगंड असतो याची जाणीव आपणास केव्हा होणार? खरे सामर्थ्यवान वा बलवंत हे उठता-बसता शड्डू ठोकत नाहीत. हा मुद्दा येथे प्रकर्षाने लक्षात घ्यावयाचा याचे कारण हा काही पहिला आणि शेवटचा महाकुंभ नाही. याच्याआधीही असे अनेक कुंभ झाले आणि यानंतरही ते होतील. याच्याआधी कोणास 'सर्वाधिक गर्दीचा' इत्यादी दावे करण्याची गरज वाटली नाही. आताच ती वाटण्याचे कारण काय? बरे, असा दावा करायचा तर व्यवस्थाही तितकीच चोख हवी. ती किती नव्हती हे परदेशी वृत्तवाहिन्या पाहून कळते. बाकी एरवी एखादा फटाका फुटला तरी 'थेट प्रक्षेपणा'त 'वहां का माहौल कैसा है' सांगण्यास उतावळ्या आपल्या वृत्तवाहिन्यांनी या दुर्घटनेबाबत पाळलेली 'मौनी अमावास्या' डोळ्यांत न भरणे अवघड. असो. या मुहूर्तावर पवित्र गंगेच्या अतिपवित्र संगमात डुबकी मारण्यास गेलेल्या उत्सुकांचा लोंढा हाताबाहेर गेला. गंगाकिनारी झोपलेले अनेक पायदळी तुडवले गेले. या अपघातानंतर त्या राज्याचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी तेथे हजर भक्तगणांस आवाहन केले आणि संतमहंतांच्या प्रमुखांनीही काही भूमिका घेतली. त्यावरून काही प्रश्न पडतात. जसे की सर्व भक्तांनी संगमावर येण्याचा हट्ट बाळगू नये, जवळ जो कोणता घाट असेल तेथे स्नान करून घ्यावे असे योगी म्हणाले. ते योग्यच. मग मुद्दा असा की 'जवळ असेल त्या' घाटावर स्नान केल्याने तितक्याच पुण्याची हमी दिली जाणार असेल तर मग गावोगावच्या भक्तांनी जीव कष्टवून संगमावर जाण्याची गरजच काय? आपल्याकडे प्रत्येक नदीलाच गंगावतार मानले जाते. त्यातील अनेक कोरड्याठाक झाल्या असल्या तरी या मुहूर्तावर या नद्यांत पाणी सोडून अनेकांच्या पुण्यप्राप्तीची हमी आपल्या अधिकारीगणांनी दिलीच असती. नाशिकमध्ये एका बड्या नेत्यांस पुण्यप्राप्ती व्हावी म्हणून विशेष पाणी कसे सोडले गेले याचे स्मरण काहींस या निमित्ताने होईल. ते योग्यच. तसे केले असते तर गावोगावच्या नद्यांना यानिमित्ताने तरी ऊर्जितावस्था आली असती आणि स्थानिकांना पुण्यप्राप्तीसाठी हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या नसत्या. दुसरा मुद्दा संतमहंतांच्या प्रमुखांनी घेतलेल्या अत्यंत समंजस भूमिकेचा. या अपघातानंतर त्यांनी आजच्या सुमुहूर्तावर स्नान (काही काळ तरी) थांबवले. त्यांच्या या समंजस कृतीचा असाही अर्थ निघू शकतो की महाकुंभांच्या काळात कधीही संगम स्नान केले तरी ते तितकेच पुण्यदायी असू शकते. हा अर्थ बरोबर असेल तर या आजच्या मुहूर्ताचा इतका डांगोरा पिटायचे कारण काय? कुंभ-काळात कधीही या, असे भाविकांस सांगता आले असते. चेंगराचेंगरीच्या अपघातामुळे तेच करण्याची वेळ आयोजकांवर अखेर आली. त्यातही, आजच्या सुमुहूर्तावर प्रयागराजकडे निघालेल्या विशेष रेल्वेगाड्या आयोजकांनी रद्द केल्याची बातमी सकाळी आली. मग दुपारी उशीरा त्या रद्द नसल्याची बातमी आली. या घोळामुळे या विशेष गाड्यांतून येणाऱ्या कित्येक भक्तांस आजचा मुहूर्त गाठता आला नाही. त्यांचा हिरमोड झाला असणार आणि निसटलेल्या पुण्यप्राप्तीसाठी आणखी १२ वर्षे थांबावे लागणार किंवा काय, या प्रश्नाने ते हताश झाले असणार. त्यांचे हरपलेले पुण्य लवकरात लवकर त्यांस कसे मिळेल, याचा विचार आता सरकारला करावा लागणार. या दुर्दैवी अपघातापेक्षा महाकुंभातील अधिक सुदैवी बातमी होती ती आदरणीय ममता कुलकर्णी यांच्या साध्वीकरणाची. त्या आता किन्नर आखाड्याच्या पदाधिकारीही झाल्या आहेत. म्हणजे इतके दिवस या ममतेकडे 'स्त्री' म्हणून आणि त्या नजरेतून पाहणाऱ्या देशातील लाखो पुरुषांचा हा मानभंग मानायचा का? अन्यथा 'अंगे भिजली जलधारांनी' अशी ललना काही नरपुंगवांस आलिंगने देताना पाहावयाची सवय झालेल्यांस त्यांचे 'किन्नर'पण स्वीकारावे लागणे हा स्वप्नभंग ठरेल. अर्थात किन्नर नसतानाही किन्नरांत सामील होता येते अशी काही धर्मसोय असल्यास ते माहीत नाही. तसा खुलासा अद्याप तरी कोणी केलेला नाही वा कोणी मागितलेलाही नाही. तथापि त्यांच्या या साध्वीपणास आक्षेप घेतला तो ओरिजनल बाबा रामदेव यांनी. याबद्दल बाबांचे अभिनंदन करावे की हा त्यांच्या पुरुषी मानसिकतेचा आविष्कार मानावा, हे ठरवणे अवघड. पण बाबांनी या ममताबाईंचा अमली पदार्थ सेवन इतिहास, त्यांनी मध्यंतरी इस्लाम धर्म स्वीकारल्याची वदंता याचा उल्लेख केला. पण तो निरर्थक ठरतो. कारण ममताबाईंच्या साध्वीपणाच्या आड अमली पदार्थ सेवन हा काही आक्षेप घ्यावा असा मुद्दा असणार नाही. आणि त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला होता हे सत्य असेल तर यानिमित्ताने एक यवन कमी झाला याचा आनंद आहेच. पण बुधवारी पहाटे जे झाले ते झाले नसते तर महाकुंभास गालबोट लागते ना. आगामी काळात अशा सोहळ्यांतून या त्रुटी दूर व्हाव्यात यासाठी देशातील मेजॉरिटीने मौनाविषयीची आपली ममता सोडायला हवी. तसे करणे अधिक पुण्यप्रद असेल.

पंकजा यांच्या विरोधासाठी दिल्लीच्या हयात हॉटेलात धनंजय मुंडे आणि नामदेव शास्त्रींचा प्लान

राष्ट्रवादीच्या नेत्याचा गंभीर आरोप

बीड, (प्रतिनिधी):-धनंजय मुंडे हा खंडणी घेऊन जगणारा माणूस नाही. त्यांच्यासोबत मीडिया ट्रायल सुरू आहे. राजकीय स्वार्थासाठी जातीय तेढ या निमित्ताने निर्माण होत आहे. पक्षाचे नेते यांना देखील याची जाणीव की मुंडे गुन्हेगार नाही. धनंजय मुंडे यांनी किती सोसावं? असे विधान भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी केले आहे. त्यांच्या या विधानानंतर आता यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. त्यातच आता राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या एका नेत्याने धनंजय मुंडे आणि नामदेव शास्त्रींवर गंभीर आरोप केले आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते राजाभाऊ फड यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना धनंजय मुंडे आणि नामदेव शास्त्रींबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी थेट भाष्य करत गंभीर आरोप केले. यावेळी त्यांनी महादेव मुंडे हत्या प्रकरणीही भाष्य केले. नामदेव शास्त्री महाराज यांनी संपूर्ण प्रकरण तपासून आपली भूमिका मांडली पाहिजे होती. भगवान गडाच्या मागून धनंजय मुंडे हे राजकारण करत आहेत. नामदेव शास्त्री महाराज यांची भूमिका मला तरी पटलेली नाही. पंकजा मुंडे यांना सुद्धा धनंजय मुंडे यांनी त्रास दिला आहे. पंकजा मुंडे यांनी भगवान गडावर २०१६ ला भाषण करु नये यासाठी काय प्लानिंग करावी यासाठी हे नामदेव शास्त्री महाराज आणि धनंजय मुंडे यांनी दिल्लीतील हयात हॉटेल मध्ये मीटिंग केली होती. त्यानंतर पंकजा ताई यांना भगवान गडावर येण्यापासून रोखण्यात आला, असा आरोप राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते राजाभाऊ फड यांनी केला. धनंजय मुंडे हा समाजाचा सुद्धा होऊ शकत नाही. याने समाजातील लोकांच्या हत्या केल्या आहेत. याला मंत्रिपद प्यार झालं आहे त्यामुळे तो मंत्रिपदासाठी राजीनामा देत नाही. त्याने राजीनामा द्यावा आणि चौकशी होऊ द्यावी. नंतर ते दोषी आढळले नाही तर त्यांना मंत्रिपदासाठी पुन्हा मुख्यमंत्री घेतील ना, असेही राजाभाऊ फड म्हणाले. महादेव मुंडे यांना मी ओळखत होतो. पण गेल्यावर्षी त्यांची हत्या परळीत झाली. त्या हत्येमध्ये मला अडकवण्याचा प्रयत्न हा धनंजय मुंडे यांनी केला. मी त्यांचा परळीमध्ये राजकीय विरोधक होतो. त्यामुळे त्यांनी मला टार्गेट केलं होतं आणि या हत्येत मला फसववण्याचा प्रयत्न करण्यात आला. खरे जे महादेव मुंडे यांचे मारेकरी आहेत ते अजून मोकाट आहेत, असा आरोपही राजाभाऊ फड यांनी केला.

तर दिवसा मुदडे पडतील-धनंजय देशमुख

बीड, (प्रतिनिधी) :-मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणावरुन राजकीय वातावरण चांगलंच तापलं असून राजकीयनंतर आता अध्यात्मिक संत, महंतांनीही याप्रकरणात उडी घेतली आहे. राज्याचे अन्नपुरवठा मंत्री आणि बीडमधील नेते धनंजय मुंडे (उहरपरपक्षरू ींपवश) यांनी भगवानगडावर जाऊन भगवान बाबाचे दर्शन घेतले आणि भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री (छरावर्शे हिर्ींीळ) यांच्यासोबत राजकीय, सामाजिक परिस्थितीवर भाष्य केलं. त्यानंतर, धनंजय मुंडे हे खंडणी प्रकरणात गुन्हेगार नाहीत हे मी १०० टक्के खात्रीने सांगतो, असेही त्यांनी म्हटले. मात्र, हे सांगत असतानाच आरोपींना आधी चापट मारली गेली आणि त्यानंतर हे घडले, त्यामुळे आरोपींच्या मानसिकतेचाही विचार करायला हवा, असे नामदेवश शास्त्री यांनी म्हटले. त्यावर बोलताना धनंजय देशमुख म्हणाले की, एक चापट मारली म्हणून त्याच्या बदल्यात १० चापटा त्यांनी मारल्या असत्या तरी चालले असते. मात्र, केवळ एकाच चापटेच्या बदल्यात अशा प्रकारचा भीषण खून करण्यात आला. संतोष देशमुखने ज्या आरोपीला चापट मारली, त्या चापट मारलेल्या आरोपीवर २२ गुन्हे आहेत. एक चापट मारली म्हणून त्यांनी एवढा भीषण खून केला. एका चापटेच्या बदल्यात त्यांनी आम्हाला १० चापट मारल्या असत्या तरी चाललं असतं, असे म्हणत नामदेव शास्त्री यांच्या वक्तव्यावर धनंजय देशमुख यांनी आपली भूमिका मांडली. यावेळी, शास्त्री महाराजांच्या वक्तव्यावरुन त्यांनी संतापही व्यक्त केला आहे. एक चापट मारली म्हणून त्यांची मानसिकता काय झाली असेल असं तुम्ही म्हणता, मग आज आमची मानसिकता काय झाली असेल हे समाज बघतोय, सगळे लोकं बघतायत, त्याचंही उत्तर दिलं पाहिजे असे धनंजय देशमुख यांनी म्हटले. राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी आरोपींना फाशी होणार असं म्हटलंय, आता आम्ही त्याचीच वाट बघतोय, तीच आमची मानसिकता आहे, असे धनंजय देशमुख यांनी म्हटल. एका चापटीच्या बदल्यात खून करायची मानसिकता तुमची असेल तर तुम्ही समाजाचं देणं लागत नाहीत हे स्पष्ट झालंय. पण, अशी जर मानसिकता कोणी केली तर दिवसा मुदडे पडतील, अशा शब्दात धनंजय देशमुख यांनी आपला संताप व्यक्त केला.

लाल टोमॅटोची शेतीच भारी! बीडच्या तरुणाचं नशीब पालटलं

बीड, (प्रतिनिधी) :-मेहनत, जिद्द आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग केल्यास शेतीतूनही भरघोस उत्पन्न मिळवता येते हे बीड जिल्ह्यातील राहुल राठोड यांनी सिद्ध केले आहे. राहुल यांच्याकडे तीन एकर शेती असून पारंपरिक पिकांसोबतच त्यांनी एका एकरात टोमॅटो लागवड सुरू केली. गेल्या पाच वर्षांपासून त्यांनी या क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले असून एका एकरातून चार लाख रुपयांपर्यंत वार्षिक कमाई साध्य केली आहे. राहुल यांच्या शेतीचा प्रवास सहज नव्हता. ते कारखान्यात कामगार म्हणून कार्यरत असताना शेती सांभाळणे हे मोठे आव्हान होते. मात्र त्यांनी मेहनत आणि नियोजनाच्या जोरावर नोकरी आणि शेती यांचा योग्य समन्वय साधला. पारंपरिक ज्वारी-बाजरी शेतीपुरती मर्यादित न राहता त्यांनी टोमॅटो उत्पादनाचा प्रयोग केला आणि त्याला बाजारपेठेत चांगला प्रतिसाद मिळवला. टोमॅटो उत्पादन करताना त्यांनी सेंद्रिय खतांचा वापर ठिबक सिंचन प्रणाली आणि कीड व्यवस्थापन यावर भर दिला. टोमॅटो पिकाची योग्य निगा राखल्यामुळे उत्पादनाचा दर्जा उत्तम राहिला. शिवाय स्थानिक व्यापाऱ्यांशी थेट संपर्क साधून त्यांनी मध्यस्थ टाळले आणि अधिक नफा मिळवला. बाजारातील मागणी-पुरवठ्याचा अभ्यास करून योग्य वेळी माल विक्री केल्यामुळे त्यांना हमखास चांगला दर मिळतो. राहुल यांचा प्रवास इतर तरुण शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरतो. अनेक तरुण शेतीकडे दुर्लक्ष करतात. मात्र आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक शेती पद्धती अवलंबल्यास कमी क्षेत्रातही चांगले उत्पन्न मिळू शकते हे त्यांनी दाखवून दिलेलं आहे. भविष्यात ते सेंद्रिय शेतीला अधिक चालना देण्याचा आणि इतर भाजीपाला उत्पादन वाढवण्याचा मानस ठेवतात. शेती ही नोकरीला पर्याय ठरू शकते फक्त योग्य नियोजन आणि मेहनत गरजेची आहे, असे राहुल सांगतात. टोमॅटो शेतीत यश मिळवल्यानंतर ते आता स्वतःचे उत्पादन थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचे स्वप्न पाहत आहेत. त्यांच्या जिद्दीच्या जोरावर ते भविष्यात आणखी मोठे यश मिळवतील यात शंका नाही.

पान १ वरून

पंकजांसाठी गडाची दारं बंद...

समाजाने फुलासारखं तळहातावर पंकजांना झेलले, हे विसरता येणार नाही. शेवटी न्यायशास्त्री नामदेव महाराजांनी न्याय करताना स्त्री आणि पुरुष हा भेद केलाच की... असे म्हणत प्रकाश महाजन यांनी नामदेव शास्त्री यांच्यावर निशाणा धनंजय मुंडे संकटात आहे असे वाटत नाही पण माध्यमांकडून भास निर्माण केला जातोय. एखाद्या

माणसाला अशा प्रकारे लक्ष्य केले जाणे हे बरोबर नाही, असेही प्रकाश महाजन म्हणाले. तसेच गोपीनाथरावांनी त्यांचा जीव पणाला लावून गुन्हेगाराविरोधात शड्डू ठोकला होता, आवाज उठवला होता पण दुर्दैवाने आज त्यांच्याच घरातून राजकारणाचे गुन्हेगारीकरण होतंय, याचे वाईट वाटते, अशी खंतही प्रकाश महाजन यांनी बोलून दाखवली.

शेतकऱ्यांसाठी आनंदवार्ता...

निर्णयाचा मोठा फायदा होईल. तुरीची देखील खरेदी होत राहील. ११ लाख टन सोयाबीनची खरेदी झाली आहे, गोडवून कमी पडत आहेत, असे मंत्री रावल म्हणाले. शेतकऱ्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे, शेतकऱ्यांना या निर्णयाचा मोठा फायदा होईल. तुरीची देखील खरेदी होत राहील. ११ लाख टन सोयाबीनची खरेदी झाली आहे, गोडवून कमी पडत आहेत, असे मंत्री रावल म्हणाले. पुढे परिस्थिती आली तर पुन्हा खरेदी वाढीसाठी मुदत परिस्थिती पाहून घेऊ, असे आश्वासन पण त्यांनी दिले. महाराष्ट्रातील सोयाबीन उत्पादक शेतकर्यांना मी सांगतो हे तुमचं हक्काचं सरकार आहे, सगळ्या शेतकर्यांचा माल हा खरेदी केला जाईल, असे रावल म्हणाले. पुढे परिस्थिती आली तर पुन्हा खरेदी वाढीसाठी मुदत परिस्थिती पाहून घेऊ, असे आश्वासन पण त्यांनी दिले. महाराष्ट्रातील सोयाबीन उत्पादक शेतकर्यांना मी सांगतो हे तुमचं हक्काचं सरकार आहे, सगळ्या शेतकर्यांचा माल हा खरेदी केला जाईल, असे रावल म्हणाले. सोयाबीनचे दर कोसळत असल्याने शेतकरी नाराज आहेत. त्यांना सोयाबीनला जादा दर हवा आहे. त्याकडे सरकारने लक्ष देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. गेल्या तीन वर्षाचा विचार करता, सोयाबीनच्या दरात ३१ टक्क्यांनी घसरण झाल्याचे दिसून आले आहे. सोयाबीनचे दर कोसळत असल्याने शेतकरी नाराज आहेत. त्यांना सोयाबीनला जादा दर हवा आहे. त्याकडे सरकारने लक्ष देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. गेल्या तीन वर्षाचा विचार करता, सोयाबीनच्या दरात ३१ टक्क्यांनी घसरण झाल्याचे दिसून आले आहे.

धनंजय मुंडे खंडणीवर...

पान १ वरून

धनंजय मुंडे हे गेल्या काही दिवसापासून तणावात आहेत.गुरुवारी बीडची बैठक संपवून मुंडे मुक्कामी भगवानगडावर गेले. त्या ठिकाणी नामदेव शास्त्री आणि मुंडे यांच्या दोन तास चर्चा झाली.ङ्गशुक्रवारी सकाळी नामदेव शास्त्री यांनी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका मांडली. ते म्हणाले कि, गावातील वादातुन मसाजोग मध्ये हा प्रकार घडला, जो दुर्दैवी आहे. मात्र यामध्ये धनंजय मुंडे यांचा दोष नाही. त्यांना गेल्या दोन महिन्यापासून मीडिया कडून टार्गेट केलं जात आहे. ते भगवानगडाचे निसिम भक्त आहेत. खंडणी वर जगणारे नेते नाहीत. लोकांमध्ये राहून त्यांच्या अडचणी सोडवणार्या नेत्याला आज अडचणीत आणले जातं आहे. भगवान गड भक्कमपणे मुंडे यांच्या पाठीशी आहे. माझे आशीर्वाद त्यांच्या सोबत आहेत. ते दोषी नाहीत असे म्हणत शास्त्री यांनी या सगळ्या वादात मंत्री मुंडे यांची बाजू भक्कमपणे मांडली आहे.

बाजारात कपडे काढून...

गड उभा राहिले पाहिजे. आम्ही त्यासाठी लढत आहोत. मला नामदेव शास्त्री काय म्हणाले या वादात पडायचे नाही. कारण मी त्यांचा पूर्ण अभ्यास केला आहे. तुम्ही ही करा मग तुम्हाला कळेल. बजरंग सोनवणे यांनी या भूमिकेद्वारे एकप्रकारे नामदेवशास्त्री यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. यावेळी त्यांनी धनंजय मुंडे यांच्यावरही हल्ला चढवला. सामाजिक सलोखा राखणे ही सर्वच राजकीय नेत्यांची जबाबदारी आहे. कालच डीपीडीसीची बैठक झाली. त्यावेळी सर्वांनी समोरासमोर बसायचे होते. सामाजिक सलोखा कोण बिघडवत आहे हे पहायचे होते. पण आता जे बाजारात कपडे काढून फिरतात त्यांचे म्हणणे असे आहे की मी नैतिक आहे, असे ते म्हणाले. धनंजय मुंडे मंत्री असताना त्यांच्या काळात राखेचे किती टेंडर निघाले? तेव्हा नैतिकतेचे काय? माझ्या जिल्ह्यातील एका निष्पाप सरपंचाला तुम्ही ठार केले. ज्यांनी मारले त्या सर्वांचे लागेबांधे तुमच्यापर्यंत येतात. या प्रकरणी फक्त राख तपासा, मग त्यांची खरी नैतिकता बाहेर येईल. त्यांच्या घरातील सदस्य रेतीचे धंदे करतात. दादागिरी व व नैतिकता न बाळगणाऱ्या माणसाचा या सर्व गोष्टीतून अंत होतो. बजरंग सोनवणे यांनी यावेळी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मुद्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात एकवाक्यतेचा अभाव असल्याचाही आरोप केला. मुख्यमंत्री म्हणतात धनंजय मुंडे यांचा राजीनाम्याचा निर्णय त्यांचा पक्ष घेईल. अजित पवार याविषयी निर्णय घेतील. दुसरीकडे अजित पवार हा निर्णय मुख्यमंत्र्यांवर सोपवतात. याचा अर्थ या दोन्ही नेत्यांमध्ये या मुद्यावर एकवाक्यता नाही, असे सोनवणे म्हणाले.

संतोष देशमुख प्रकरणापेक्षाही गुंड्या गायकवाडांचा खून

गुणरत्न सदावर्तेंचा सुरेश धस यांच्यावर गंभीर आरोप काय?

मुंबई, (वृत्तसेवा):-बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली. या प्रकरणातील सात आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई केली जात आहे. तर एक आरोपी अद्याप फरार आहे. या प्रकरणानंतर बीडमधील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या घटनेनंतर अनेक प्रकरण समोर येत आहेत. त्यातच आता ज्येष्ठ वकील गुणरत्न सदावर्ते यांनी भटक्या विमुक्त समाजातील आदिवासी मागास समाजातील गुंड्या गायकवाड यांच्या हत्येबद्दल प्रश्न उपस्थितीत केले आहेत. यावेळी गुणरत्न सदावर्ते यांनी आमदार सुरेश धस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. हा देश संविधानावर चालतो. कोणाची जात उच्च आणि नीच आहे, अशी कोणतीही तरतूद या संविधानामध्ये नाही. आरोपी हा आरोपी आहे, मग तो कोणीही असो कोणत्याही जाती धर्माचा असो आरोपी हा आरोपी असतो. भटक्या विमुक्त समाजातील आदिवासी मागास समाजातील गुंड्या गायकवाड साहेब यांचा जो खून झाला, हे प्रकरण

बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरणापेक्षा देखील गंभीर आहे. कशाप्रकारे हत्यारे तयार करण्यात आली ते धस यांचे शेत होतं का? असा सवाल गुणरत्न सदावर्ते यांनी केला आहे. सुरेश धस यांच्या पत्नीने तीन लाख रुपये पाठवले होते, ती रक्कम जप्त होते. केंद्र हे तपासातील अधिकारी ते मेन विटनेस आहेत. ते डंके की चोट पे सांगत आहेत धस यांना आज देशमुख प्रकरणावर बोलण्यासाठी तोंड राहिलेले नाही. धस कोण आहेत हे मराठा समाजाचे आहेत. उच्च जातीचे आहेत. ते तत्कालीन मंत्री होते हे काहीही मायने राखत नाही. त्यांच्या कुटुंबाचे इन्व्हॉलमेंट गुंड्या गायकवाड मर्डर केसमध्ये असेल तर बाबतीत पूर्णपणे छडा लागला पाहिजे, अशी मागणी गुणरत्न सदावर्ते यांनी केली. पोलीस अधिकारी केंद्रे यांचे स्टेटमेंट रेकॉर्ड करून पुन्हा तपास पुढे घेऊन गेले पाहिजे. सुरेश धस यांच्या पत्नीने आरोपीला तीन लाख रुपये केसमधून काढता पाय घेण्यासाठी दिली असेल, हत्यारे धसांच्या शेतातून जप्त केले असतील, आरोपीला पकडण्यापासून मज्जाव केला असेल तर त्यांचे इन्वॉलमेंट आहे, असाही गंभीर आरोप गुणरत्न सदावर्ते यांनी केला. जितेंद्र आव्हाड यांना परत सांगतो, तुम्ही घसा कोरडा करून ओरडत होता तर या बाबतीमध्ये तर तुम्हाला आता बोललच पाहिजे. ठाण्यात येऊन ठणकावून डंके की चोट पे सांगतो अगोदर जितेंद्र आव्हाड साहेबांनी गुंड्या गायकवाड साहेब जे मागासवर्गीय होते यांची हत्या झाली त्यांच्यावर बोलायचं. अगोदर झालेले खून काय खून नव्हते का? त्यातून काय रक्त निघत नव्हतं का? त्या रक्ताला काय किंमत नव्हती? असा सवालही गुणरत्न सदावर्ते यांनी केला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

बीड तालुक्यात एनडीआरएफ पथकामार्फत बिंदुसरा तलावात प्रशिक्षण व जनजागृती

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिलेल्या माहितीनुसार बीड तालुक्यातील पाली जवळील बिंदुसरा तलावात एनडीआरएफ च्या १६ जणांच्या पथकामार्फत शुक्रवार दि ३१ जानेवारी रोजी शालेय विद्यार्थी , नागरिक यांना नैसर्गिक आपत्तीत कशाप्रकारे स्वतःचा बचाव करावा , इतरांस सहाय्य करावे याबाबत प्रशिक्षण देण्यात आले . यावेळी विविध शासकीय अधिकारी , कर्मचारी , पोलीस विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते .



किशोर जाधव यांच्या नेतृत्वाखाली राजू प्रसाद , गवळी संतोष , संतोष शिंदे, दानवे अनिल, पाटील अनिल, मोरे किशोर राम, पवार विशाल, खवारे किरण, जायभाय शिवम, नीता कुंडेकर, बागुल विनेश, मोरे अमोल, गायकवाड सुनील , सय्यद मुनीर , भालेराव गणेश या एनडीआरएफ टीम मधील अधिकारी व कर्मचारी यांनी मौजे पाली येथील बिंदुसरा डॅम येथे प्रात्यक्षिक करून दिले. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या पुढाकारातून जिल्हाभर नागरिकांना , विद्यार्थ्यांना शासकीय अधिकारी , कर्मचाऱ्यांना नैसर्गिक आपत्तीचे वेळी कशाप्रकारे आपत्तीग्रस्तांना मदत करावी स्वतःच्या जीवाची काळजी घेत इतरांना कशी मदत करावी याबाबतचे प्रशिक्षण देण्याची योजना विचाराधीन होती. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी जिल्ह्यातील बिंदुसरासारखी धरणे तलाव याची माहिती घेतली. त्यानुसार एनडीआरएफची टीम सर्वत्र जाऊन जनतेला व शासकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे कार्यक्रम राबवित आहे. बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या माध्यमातून बीड , गेवराई व शिरूर तालुक्यात अशी प्रशिक्षणे आयोजित करण्यात आलेली आहेत . पावसाळ्यात अनेक ठिकाणी धो धो पाऊस बरसतो . यामुळं संपूर्ण जनजीवन विस्कळीत होत . अशा वेळी पूरस्थितीतून नागरिकांची सुटका करण्यासाठी प्रथम धावून येतं ते एन डी आर एफ च पथक . भूकंप , महापूर , त्सुनामी , चक्रीवादळ आणि इतर नैसर्गिक आपत्तीवेळी एन डी आर एफ दलाला पाचारण केलं जात . एन डी आर एफ (नॅशनल डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स) म्हणजेचं राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल.

एन डी आर एफ म्हणजे काय? अनेकदा पूरस्थितीत , भूकंप किंवा चक्रीवादळ अशा स्थितीत नागरिकांच्या मदतीला एन डी आर एफ चे जवान येतात . या दलाचे जवान पूर किंवा आपत्तीने ग्रस्त असलेल्या ठिकाणच्या नागरिकांचे प्राण वाचवतात . तुम्हाला प्रश्न पडला असेल की एन डी आर एफ म्हणजे नेमकं काय ? एन डी आर एफचे पूर्ण नाव हे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आहे . एनडीआरएफ ही एक अशी शक्ती आहे की , जी नैसर्गिक आपत्ती असताना काम करते . यासाठी भूकंप , पूर यासारख्या परिस्थितीत , एनडीआरएफ फोर्सची एक टीम तयार केली जाते . संकटात सापडलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी या टीमला पाठवलं जात . यात तीन बीएसएफ , दोन सीआरपीएफ , दोन सीआयएसएफ , दोन आयटीबीपी आणि दोन एसएसबी जवानांचा समावेश असतो . जिथे जिथे कोणत्याही प्रकारची नैसर्गिक आपत्ती येते तिथे ही टीम अडकलेल्या लोकांसाठी मदत कार्य करते . एन डी आर एफ हे १२ बटालियनचे एक दल आहे. दरवर्षी मुसळधार पावसामुळं अनेक ठिकाणी पूर येतो . यावेळी एन डी आर एफ कामाला येते . यात तीन सीमा सुरक्षा दल , तीन केंद्रीय राखीव पोलीस दल , दोन केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल , दोन इंडो-तिबेट सीमा पोलीस , दोन सशस्त्र सीमा बल आणि एक आसाम रायफल्स . प्रत्येक बटालियनची एकूण संख्या अंदाजे १ हजार १४९ आहे . प्रत्येक बटालियनमध्ये इंजिनीअर , तंत्रज्ञ , इलेक्ट्रिशियन , श्वान पथक आणि वैद्यकीय / पॅरामेडिक्ससह असे प्रत्येकी ४७ जवान असतात.

कधी झाली एन डी आर एफ फोर्सची स्थापना ? आपत्ती व्यवस्थापन कायदा , २००५ अंतर्गत धोकादायक आपत्ती परिस्थितीला विशेष प्रतिसाद देण्याच्या उद्देशाने २००६ मध्ये राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची स्थापना करण्यात आली . एन डी आर एफ हे केंद्रीय गृह मंत्रालयाच्या आखत्यारित येते . एनडीआरएफ फोर्स ही १६ बटालियनची एक फौज आहे . जी पॅरा-मिलिटरी लाइनवर आधारीत आहे . भारताच्या निमलष्करी दलांकडून प्रतिनियुक्तीवर व्यक्तींनी तयार केली जाते . एन डी आर एफ चे घोषवाक्य हे 'आपदा सेवा सदैव' असे आहे . या घोषवाक्याचा अर्थ आपत्तीच्या वेळी सदैव सेवा हीच प्राथमिकता असा होतो . पियुष आनंद हे देशपातळीवर महासंचालक आहेत . संतोष बहादूरसिंग हे महाराष्ट्र एन डी आर एफचे (कमांडंट) प्रमुख आहेत.

महाराष्ट्र आणि गोवा ही राज्य पाचव्या बटालियनच्या कार्यक्षेत्रात येतात . यामध्ये एकूण १८ तुकड्या आहेत . यापैकी मुंबईत ३ , पुण्यात १४ तर नागपूरमध्ये १ तुकडी आहे.

एन डी आर एफ मध्ये कसे जावे ? एनडीआरएफम ध्ये दाखल होण्यासाठी बीएसएफ , सीआरपीएफ , सिआयएसएफ, आयटीबीपी आणि एसएसबी यांसारख्या पॅरामिलिटरीचे जवान असणे आवश्यक आहे . कारण प्रतिनियुक्तीच्या माध्यमातून जवानांची नियुक्ती केली जाते . प्रतिनियुक्तीचा कालावधी सात ते नऊ वर्षं इतका असू शकतो . जवानांना १९ आठवड्यांचे आंतरराष्ट्रीय स्तराचं प्रशिक्षण दिलं जातं

एन डी आर एफ : प्रशिक्षण

आपत्ती व्यवस्थापनाच्या मूलभूत गोष्टींमध्ये आधी राज्य पोलीस कर्मचार्यांना प्रशिक्षित केले जाते . दुसरे म्हणजे , राज्य आपत्ती प्रतिसाद म्हणून त्यांच्या राज्य सशस्त्र पोलीस तुकड्यांमधून किमान एका बटालियनला प्रशिक्षित केले जाते . तसेच एन डी आर एफ च्या धर्तीवर फोर्स एन डी आर एफ दल कार्यरत असते . पोलिस कर्मचार्यांव्यतिरिक्त , अग्निशमन सेवा , गृहरक्षक दल आणि नागरी संरक्षण यांच्या विद्यमान संसाधनांमधून एन डी आर एफची स्थापना केली जाते

देशात १३ ठिकाणी ठिकाणी तैनात करण्यात आलेल्या बटालियनच्या टीम पुढीलप्रमाणे आहेत.

१) बीएन एनडीआरएफ , गुवाहाटी , आसाम - बीएसएफ, २) बीएन एनडीआरएफ , नदिया, पश्चिम बंगाल - बीएसएफ , ३) बीएन एनडीआरएफ , कटक ओडिशा - सीआईएसएफ , ४) बीएन एनडीआरएफ , वेल्लोर , तामिळनाडू- सीआईएसएफ , ५) बीएन एनडीआरएफ , पुणे , महाराष्ट्र - सीआरपीएफ , ६) बीएन एनडीआरएफ , वडोदरा , गुजरात - सीआरपीएफ , ७) बीएन एनडीआरएफ , गाजियाबाद , उत्तर प्रदेश - आईटीबीपी , ८) बीएन एनडीआरएफ , भटिंडा, पंजाब - आईटीबीपी , ९) बीएन एनडीआरएफ , पटना, बिहार - बीएसएफ, १०) बीएन एनडीआरएफ , गुंटूर , आंध्र प्रदेश - सीआरपीएफ , ११) बीएन एनडीआरएफ , वाराणसी, उत्तर प्रदेश - एसएसबी , १२) बीएन एनडीआरएफ , ईटानगर , अरुणाचल प्रदेश - एसएसबी , १३) बीएन एनडीआरएफ , जम्मू आणि काश्मिर - आसाम रायफल

मागच्या काही वर्षातील एनडीआरएफच्या प्रमुख कारवाया (ऑपरेशन) पुढीलप्रमाणे आहेत.

२०१५ मध्ये एप्रिल महिन्यात नेपाळ आणि भारताच्या काही भागात भूंकप झाला होता . त्यावेळी एनडीआरएफच्या टीम भारत आणि नेपाळच्या काही भागांमध्ये गेल्या होत्या . नोव्हेंबर २०१५ मध्ये चेन्नई आणि तामिळनाडूमध्ये काही भागात पूर आला होता . त्यावेळी तेथील हजारो नागरिकांना वाचवण्याचे काम एन डी आर एफ च्या जवानांनी केलं होते . केरळमध्ये ऑगस्ट २०१८ मध्ये आलेल्या पुराच्या वेळी एन डी आर एफ च्या ५८ तुकड्यांची नियुक्ती करण्यात आली होती. एका राज्यात एन डी आर एफ ची उभारणी झाल्यापासून आतापर्यंतची सर्वाधिक तैनाती होती. यावेळी १९४ लोकांचा जीव वाचवण्यात एन डी आर एफ ला यश मिळालं होत . दहा हजारहून अधिक लोकांना बाहेर काढण्यात आले होते. २०२० साली आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम इथे गॅस गळतीची घटना घडली होती . ७ मे २०२० ला ही घटना घडली होती . यावेळी देखील एन डी आर एफ ची भूमिका महत्वाची होती . याच वर्षी पश्चिम बंगालमध्ये अम्फान चक्रीवादळ आले होते. या वादळातून देखील हजारो लोकांना वाचवण्याचे काम एन डी आर एफ च्या जवानांनी केलं आहे. २०२१ साली उत्तराखंडमध्ये हिमनद्यांचा उद्रेक झाला होता . त्यावेळी तिथे पूर आला होता . ही घटना ७ फेब्रुवारी २०२१ मध्ये घडली होती . यावेळी एन डी आर एफ च्या जवानांनी हजारो लोकांना बाहेर काढले होते . तसेच ओडिशा आणि पश्चिम बंगालमध्ये यास चक्रीवादळ आलं होतं . यावेळी देखील एन डी आर एफ च्या जवानांनी मोलाची कामगिरी बजावली . बिंदुसरा जलाशयात शुक्रवारी एनडीआरएफच्या पथकाने विविध प्रात्यक्षिके करून दाखविली. शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . यावेळी शितल चाटे मंडळ अधिकारी विभाग पाली , अनिल गायकवाड ग्राम महसूल अधिकारी पाली , जितेंद्र शेळके ग्राम महसूल अधिकारी आहेरवडगाव , संदीप नवले सरपंच पाली , मनीषा मुंडे शिक्षिका जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली , अंबादास गुजर सरपंच मंजरी हवेली , आनंद मस्के ग्रामीण पोलीस स्टेशनचे कर्मचारी , योगेश निर्धार पोलीस कर्मचारी हे उपस्थित होते .कोणत्याही नैसर्गिक आपत्तीच्या वेळी जिल्हा प्रशासन व तालुका प्रशासन सज्ज आहे . अशा वेळी नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाशी संपर्क साधावा असे आवाहन बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले आहे.

कलाशिक्षक ते प्रशासकीय अधिकारी; जयभवानी व जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळातील विश्वासू

श्री. गोरकर प्रमोद (प्राचार्य) आज सेवानिवृत होतात त्या विषयी थोडसे मनोगत

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा गुरु साक्षात परब्रह्म : शिक्षक (गुरु) हा राष्ट्रनिर्माण करण्यासाठी सर्वात पूरक असा महान व्यक्ती असतो.असे म्हटले जाते. प्राचीन काळापासून आपण गुरु किंवा शिक्षकाचे महात्म्य सर्वजन ऐकून आहोत. विद्यार्थी किती हि मोठा झाला तरी गुरुची बरोबरी कधीच करू शकत नाही. तसे आपल्याला सर्व शिक्षक सांगत असतात. जरी बरोबरी केली नाही.तरी पण काही त्यांचे आदर्श आपण नक्की घेऊ शकतोत. असेच माझ्या सेवेमध्ये मला लाभलेले माझ्या मनातील एक हरहुन्नरी मुख्याध्यापक/प्राचार्य तथा जयभवानी व जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी श्री.गोरकर प्रमोद दिगंबरराव होय. ते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा येथुन वयोमानानुसार मुख्याध्यापक / प्राचार्य या पदावरून आज दि.३१ जानेवारी २०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवा कार्यकाळातील आढावा घेणारा व त्यांच्या सेवा कार्यकाळातील केलेला छोटासा लेखाजोखा .

एक आदर्श शिक्षक/मुख्याध्यापक/प्राचार्य/प्रशासकीय अधिकारी कसा असावा याचे मुर्त्यमंत स्वरूप म्हणजे श्री.गोरकर प्रमोद दिगंबरराव होय.त्यांच्यासाठी अध्यापन/शिक्षण संस्था हा कधीच पेशा नव्हता तर ते एक त्यांच्या जीवनाचे ध्येय धडपड होती. त्यांची वर्तणुकीची शिकवण दीर्घकाळ जीवनात पुरेपूर साथ देणारी ठरली. शैक्षणिक प्रगती सोबत सर्वांगीण प्रगती कशी होईल यावर त्यांचा जास्त भर असायचा. अभ्यासक्रमा व्यतिरिक्त आपल्या बुद्धीला चालना मिळून आपण वेळेप्रसंगी त्याचा वापर कसा करायचा याचे बाळकडू त्यांनी त्यांच्या सेवा कार्यकाळात व प्रशासकीय अधिकारी झाल्यापासून विद्यार्थ्यांन बरोबर आम्हा सर्व शिक्षकांना दिले. आणि महत्वाचे कि ते देताना कधीही त्यांनी कुठलाही भेदभाव वा दुजाभाव ठेवला नाही. माझे विद्यार्थी,माझे शिक्षक व माझी संस्था हे कसे आदर्श बनतील हा त्याचा अहोरात्र प्रयत्न असायचा. कुठलाही विषय असताना तो अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी नाही तर तो माझ्या मुलांच्या मनात कसा जाईल, त्याला अनुसरून त्यांची शिक्षकाकडुन शिकवुन घेण्याची व विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण कसे मिळेल. यावर त्यांचा नेहमीच भर असायचा. आणि त्यामुळेच त्यांच्याविषयी सर्व विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाबाबत एक सकारात्मक दृष्टीकोन जागृत करण्याचे कौशल्य होते. ते संस्कार त्यांनी आमच्यावर अशा वेळेस बिंबविले की ज्यावेळेस आमची क्षमता जवळपास कोरीच होती.

काही काळ तलवाडा शाळेची अवस्था दयनीय झाली होती. त्यामुळे गोरकर सरांना मा.अमरसिंह पंडित साहेबांनी मारफाळा येथुन तलवाडा येथे मुख्याध्यापक पदी बदलीवर पाठवले. तलवाडा येथे कार्यरत असतांना आपल्या कार्यकाळात विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. शाळेचा चेहरा-मोहरा बदलला. या २१व्या शतकात आपल्याला जर आपली शिक्षण पद्धती आधुनिक करायची असेल तर त्यात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे. शिकवण्याच्या व शिकण्याच्या पद्धतीत सुधारणा करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर, शाळेचा दर्जा हा शिक्षकाच्या दर्जावर अवलंबून असतो. शिक्षण विषयक कुठल्याही योजनेच्या केंद्रस्थानी शिक्षकच असतो. म्हणुन गोरकर सर यांनी माननीय साहेबांच्या मार्गदर्शनाखाली कॉम्प्युटर लॅब/ आधुनिक प्रायोग शाळा तलवाडा येथे कार्यरत केली.व ऑनलाइन च्या जगतात तलवाडा येथील विद्यार्थ्यांना त्याचा खरा लाभ झाला. शिक्षकाने आपल्या अध्यापनात विविधता, नावीन्य, कल्पकता जोपासावी. विविध अध्यापन पद्धतीचा वापर करून विदयार्थ्यांना विषय सहज समजेल अशा कौशल्याची जोपासना करावी.हे संगणक व नेट उपलब्ध झाल्याने शक्य झाले.

आपल्या विद्यार्थ्यांसाठी जी तळमळ, आत्मीयता आणि त्याबद्दल अपार परिश्रम घेण्याची तयारी जो की, प्रत्येक विद्यार्थी शिकला पाहिजे. ही मनोकामना मनी बाळगून विद्यार्थी व शिक्षक हित जपणारे व त्यांच्यात चांगली शिकवण रुजवण्यासाठी अहोरात्र मेहनत करणारे, व शाळेच्या वेळे व्यतिरिक्त जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेत तसेच विविध शाळा संस्था अंतर्गत चे काम कुठलेही वेळेचे बंधन न पाळता काम करणारे प्रशासकीय अधिकारी म्हणजे गोरकर सर होय. बीड जिल्ह्यातील रांजणी येथे गोरकर सर यांचा जन्म सुशिक्षित कुटुंबात झाला. सुरुवातीला ए.टी.डी. नंतर बी.ए. बी.पी.एड. सेवांतर्गत बी.एड अशा वेगवेगळ्या पदव्या धारण केल्या.

त्यांची प्रथम नेमनुक गेवराई तालुक्याचे शिक्षण महर्षी ज्यांनी या तालुक्यात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली असे आमचे आदरणीय माजी राज्यमंत्री मा.श्री.शिवाजीराव पंडित (दादा). यांनी स्थापन केलेल्या जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, माध्यमिक विद्यालय खळेगाव येथे दि.१६-०६-१९९४ रोजी सहशिक्षक म्हणुन नियुक्ती झाली.२८ वर्ष् ७.५ महिने सेवा काळात शिक्षक, उपमुख्याध्यापक, मुख्याध्यापक/प्राचार्य पदाचे पवित्र कार्य करून ते आज सेवानिवृत्त होत आहेत. त्याचबरोबर सामाजिक ,राजकीय क्षेत्रातही त्यांनी मौलिक कार्य केले आहे.

मा.अमरसिंह पंडित (भैय्यासाहेब), तसेच संस्था सचिव मा. जयसिंग (भाऊ) पंडित, मा. आमदार विजयराजे पंडित ,मा. पृथ्वीराजे (दादा) पंडित, शारदा स्पोर्ट अक्कॅडमी चे मा. रणवीर (काका) पंडित यांचे नेतृत्वाखाली व आदरणीय श्री. अमृत डावकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली शारदा प्रतिष्ठान ने सुरू केलेल्या विविध उपक्रमांमध्ये गोरकर सरांचा सहभाग नियमित असायचा आणि आहे. त्यांनी सामूहिक विवाह सोहळा , त्याचबरोबर शारदा महोत्सव, राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा, जनजागरण रॅली, मा. शिवाजीराव पंडित (दादा) यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित असणाऱ्या विविध स्पर्धेच्या नियोजनात त्यांचा हिरारीने सहभाग कायम असायचा , त्याचबरोबर वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, चोखपणे राबवले.

त्याचबरोबर शाळाबाह्य मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणणे, विद्यार्थ्यांना शालेय व कॉलेज जीवनामध्ये वेगवेगळे उपक्रम राबवणे, सामाजिक सलोखा अबाधित कसा राहील याचीही काळजी घेणे, नवनवीन योजना राबवणे, शिक्षकांसाठी नवीन काय करता येईल, यासाठी नेहमी प्रयत्नशील असणारे, व त्यांच्या मार्गदर्शनामुळे संस्थेतील कित्येक विद्यार्थी हे आजही चांगल्या मोठ्या पदावर कार्य करत आहेत, व त्यांच्यामुळे अनेक विद्यार्थी अनेक क्षेत्रात चमकले आहेत. व जिवनात यशस्वी झाले आहेत.

तसेच गत तीन वर्षापासून मा रणवीर (काका) पंडित यांच्या नेतृत्वात सुरू झालेल्या क्रीडा महोत्सवात गोरकर सरांनी हिरारीने भाग घेऊन, पहिल्या दोन वर्षात अनेक ट्रॉफी या तलवाडा येथील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळवता आल्या ,याचा सार्थ अभिमान आहे. व त्यामुळे शाळेला चांगल्या प्रकारचे मैदान,व क्रीडा साहित्य मिळाले. त्यामुळे या शाळेत चांगले खेळाडू तयार झाले.व बक्षिसही मिळाले.

सध्या सरांचे दोन्ही मुले उच्चशिक्षित असून एक पुणे येथे शिक्षण घेत असून एक मुंबई येथे नोकरी करत आहे. गोरकर सर यांनी त्यांच्या एकूण २८ वर्षे ७.५ महिन्याच्या सेवा कालावधीमध्ये, खळेगाव येथून प्राथमिक कलाशिक्षका पासून सुरू झालेला प्रवास पुढे तलवाडा येथे माध्यमिक शिक्षक नंतर जयभवानी विद्यालय गढी येथे उप मुख्याध्यापक त्यानंतर मारफळा येथे मुख्याध्यापक परत तलवाडा येथे प्राचार्य अशा विविध पदावर वेगवेगळ्या जबाबदारी सांभाळत, त्यांनी जयभवानी व जगदंबा या संस्थेतील चारशे ते साडेचारशे कर्मचारी कार्यरत असलेल्या संस्थेचा प्रशासकीय अधिकारी म्हणून चोखपणे कार्यभार सांभाळला. कुठेही स्वतःला कलंकित होणार नाही, याची दक्षता घेतली. जे विद्यार्थ्याचे पालक बनून मायेने काळजी घेतात; विद्यार्थ्याचे यशात आनंदाश्रू ढाळताना आणि दुसऱ्याच्या अपयशात दुःखी होताना पाहिले आहे, अनुभवले आहे. लोखंडाचे सोन्यात रूपांतर करणारा परीस मी कधी पाहिला नाही, कदाचित तो काल्पनिक ही असेल. पण चालता-बोलता परीस मी पाहिला आहे, अनुभवला आहे. होय, अनेक लोखंडी रुपी पालकांचे व कर्मचारी यांचे सोनेरी नागरिक बनवणारे गोरकर सर आहेत. अशक्य हा शब्द ज्यांच्या डिक्शनरी मध्ये नाही अशा गोरकर सरांचा मला सदैव अभिमान आहे. न भूतो न भविष्यती असे सर पुन्हा होणे नाही.

सर्व विद्यार्थ्यांसोबत अशाच पद्धतीने वागतात. ही आपुलकी आणि आपल्या विद्यार्थ्यांच्या सोबतचे असे भावनिक नाते हे फक्त गोरकर सर सारख्याच व्यक्ती करू शकतात. आमच्या सेवा काळात आम्हाला अनेक अडचणी आल्या परंतु मा. भैय्यासाहेब यांनी आदेश देताच श्री.गोरकर सरांनी त्यांच्या अनुभवातुन त्या अडचणी चुटकीसरशी सोडवल्या. मग ते सेवासातत्य असो किंवा बदली, अन्य कामे , त्यांचा काम करण्याचा अनुभव दांडगा आहे.व त्यामुळे अनेक शिक्षकांना त्याचा फायदा झाला. आज या मंगलमय निरोप दिनी आपली सदैव आठवण राहिल ,व आपल्या भावी मोठ्या आयुष्याची ईश्वरचरणी त्वरिता देवी चरणी प्रार्थना करतो. आपण घालून दिलेले आदर्श सदोदित स्मरून त्याचा पाठपुरावा येणाऱ्या जीवनात आम्ही नकीच करु. आपणास आजच्या सेवानिवृत्तीच्या व पुढिल आपल्या भावी, सुखमय, व आरोग्यदायी जिवन लाभो, व कुटुंबाला आपला चांगला वेळ मिळो अशा सुखी जिवनाच्या आपणास खूप खूप लक्ष शुभेच्छा. धन्यवाद...

- श्री.अरुण हाटकर (पर्यवेक्षक)
माध्यमिक विद्यालय तलवाडा

हमीभावाने सोयाबीन खरेदीस केंद्र सरकारची मुदतवाढ

निर्णयाबद्दल शेतकऱ्यांकडून आभार : संचालक धनंजय गुंदेकर

खाजगी बाजारात सोयाबीन केलेल्या शेतकऱ्यांना भावांतर योजनेतून प्रतिक्विंटल दोन हजारांचा भाव फरक द्यावा

बीड । प्रतिनिधी

राज्यात व बीड जिल्ह्यात सोयाबीन खरेदीच्या गोंधळावरून शेतकरी नाराज आहेत. जिल्ह्यातील खरेदी केंद्रावरील खरेदीचा वेग संथ आहे. तसेच मागील दोन आठवडे बारदाण्याच्या तुटवड्यामुळे खरेदी रखडली होती. आता खरेदी सुरू असली तरी अंतिम मुदतीला केवळ ५१ टक्के शेतकऱ्यांची खरेदी बाकी असल्याबाबत बीड जिल्ह्यातून कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक धनंजय गुंदेकर यांनी पाठपुरावा केला असता या पाठपुराव्याला यश आले आहे.

नाफेडकडे ज्या शेतकऱ्यांनी विक्री केली आहे, त्यांचे पेमेंट कालचा १ दिवस शिल्लक होता. नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी अद्यापही थकीत आहे. त्यामुळे राज्य सरकारने खरेदीसाठी मुदत वाढ द्यावी आणि खरेदी केंद्रावर विक्री केलेल्या शेतकऱ्यांचे पेमेंट तातडीने जमा करावेत, अशी मागणी बीडसह राज्यभरातील सोयाबीन उत्पादक करत होते. तसेच ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन खुल्या बाजारात विकलं आहे, अशा शेतकऱ्यांना तातडीने भावांतर योजनेतून प्रतिक्विंटल दोन हजारांची भाव फरक द्यावा, अशी मागणी संचालक धनंजय गुंदेकर यांच्याकडून करण्यात येत आहे.

सोयाबीन उत्पादकांना चांगल्या दराची अपेक्षा होती. परंतु आवकेच्या हंगामापासून सोयाबीन हमीभावाच्या खाली राहिले. त्यामुळे केंद्र सरकारने ४ हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल हमीभावाने सोयाबीन खरेदीचा निर्णय घेतला. परंतु सुरुवातीपासूनच सोयाबीन खरेदीला विघ्न लागलेली आहेत. त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसला आहे. दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी केंद्र सरकारचे अव्वर सचिव सचिन जैन यांनी पत्र काढत सोयाबीन खरेदीस कार्यकाळ वाढवून दिला आहे. ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन ऑनलाईन नोंदणी हि नाफेड कडे केली आहे, अशा शेतकऱ्यांना दिनांक ०६ फेब्रवारी २०२५ पर्यंत आपली सोयाबीन विक्री खरेदी केंद्रावर करता येणार आहे. या निर्णयाचे शेतकऱ्यांमधून स्वागत होत असून सरकारचे आभार व्यक्त केले जात असल्याचे धनंजय गुंदेकर यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हंटले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग बीड २ चे कनिष्ठ अभियंता सय्यद ए.जी. यांचा आज सेवापुर्ती गौरव समारंभ सोहळा

बीड । प्रतिनिधी

सार्वजनिक बांधकाम विभाग बीड क्र. २. अंतर्गत सा. बां. उपविभाग शिरुर (का.) चे उपविभागाचे कनिष्ठ अभियंता ए.जी.सय्यद यांचा आज दि. ३१.०१.२०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्या निमित्ताने शासकीय विश्रामगृह बीड येथे सायंकाळी ५ वा सेवापुर्ती गौरव समारंभ सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या सेवापूर्ती सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून आर. पी. तोंडे सर कार्यकारी अभियंता

सा. बां. विभाग बीड तसेच के. एल. पानसंबळ सर कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग बीड क्र. २, यासह एस.ए. मोमीन सर कार्यकारी अभियंता जि.प.बां. विभाग बीड, खादरी एम. ए.सर उपकार्यकारी अभियंता सा. बां. विभाग क्र. २, उपविभागीय अभियंता सी.पी. बोराडे सर सा.बा. उपविभाग बीड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एल. के. पानसंबंळ हे राहणार आहेत.

सत्कारमूर्ती कनिष्ठ अभियंता सय्यद ए. जी. हे अत्यंत मनमिळावू स्वभावाचे व तांत्रिकदृष्ट्या सक्षम अभियंता असून त्यांच्या अंगी स्वयंशिस्त होती. त्यांची सेवा पाटोदा, वडवणी, शिरुर येथे यशस्वीरित्या पुर्ण झालेली आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात अनेक धडाडीने कामे केल्याचे पहावयास मिळाले. त्यांनी आपल्या कार्यकाळात यशस्वीरित्या अनेक विकास कामे केली.त्यामुळे त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक झाले. त्यामुळे आज होणाऱ्या सेवापुर्ती सोहळ्यास सर्व हितचिंतक व सहकारी मित्र आणि अभियंत्यानी उपस्थित राहुन सेवापुर्ती गौरव सोहळवाची शोभा वाढवावी असे आवाहन सा. बा. उपविभाग शिरुर कासार कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

महात्मा गांधी यांना पुण्यतिथी निमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये अभिवादन

बीड । प्रतिनिधी

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये सत्य-अहिंसा आणि सत्याग्रहाचे उद्गाते आणि प्रणेते महात्मा मोहनदास करमचंद गांधी यांना पुण्यतिथी निमित्त या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये सकाळी ११ वाजता सामुदायिक अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कु. तृप्ती खंडाळे, आरती नखाते, प्रेरणा शिंदे, मानसी खंडाळे, प्राची जावळे आणि संस्कृती साळवे या विद्यार्थीनींनी देशभक्तीपर गीताचे गायन केले. या कार्यक्रमाचे संचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख, प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस. वाघमारे यांनी केले.

सोमवारी लोकशाही दिन

बीड । प्रतिनिधी

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक ३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०-०० ते दुपारी १२-०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपात्रित पदभरती परीक्षा २ फेब्रुवारी ला होणार

बीडमध्ये १४ उपकेंद्रावर ४४७९ परीक्षार्थी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकूण १४ उपकेंद्रामधून सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० या कालावधीत घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी एकूण ४ हजार ४७९ उमेदवार बसलेले आहेत. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी १४ उपकेंद्रप्रमुख १४ मदतनीस ६५ पर्यवेक्षक २१७ समवेक्षक असे एकूण ३१० अधिकारी, कर्मचारी यांची जिल्हाप्रशासनाद्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी समाज कल्याणच्या सभागृह बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख यांनी परीक्षेच्या अनुषंगाने प्रशिक्षण दिले आहे. परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे. आयोगाच्या सूचनेनुसार या परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांच्याकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाण्यास मनाई आहे. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा, अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येत आहे. पेपरच्या वेळेमध्ये उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास मनाई आहे.

केजची कृष्णा अर्बन को. ऑपरेटिव्ह बँक बँको ब्ल्यु रिबन पुरस्काराने सन्मानित

१०० कोटींच्या ठेवीपर्यंत बँकेचा सलग सहाव्यांदा सन्मान

केज । प्रतिनिधी

केज शहारातील कृष्णा अर्बन को.ऑपरेटिव्ह बँकेला १०० कोटी पर्यंत ठेवी असलेल्या बँकेमधून उत्कृष्ट नागरी सहकारी बँक म्हणून सलग सहाव्यांदा बँको ब्ल्यू रिबन पुरस्काराने लोणावळा येथे सन्मानित करण्यात आले आहे.हा पुरस्कार अविज पब्लिकेशन कोल्हापूर यांच्या वतिने दिला गेला आहे. अविज पब्लिकेशन कोल्हापूर यांच्या वतिने दरवर्षी प्रमाणे दिला जाणारा बँको ब्ल्यू रिबन पुरस्कार सलग सहाव्यांदा केजच्या कृष्णा अर्बन को.ऑपरेटिव्ह बँकेला मिळाला असून हा पुरस्कार १०० कोटी ठेवीच्या साईज पर्यंतच्या ठेवी असणाऱ्या बँकेला दिला जातो.लोणावळा येथे बँकेचे प्रतिनिधी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी जाधव तानाजी लक्ष्मणराव यांनी स्विकारला असून बँकेचा सलग पाच वेळेस या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.बँकेला मिळालेल्या पुरस्कारा बद्दल बँकेचे संस्थापक अध्यक्ष विक्रम (बप्पा) मुंडे, बँकेचे चेअरमन विजयकांत (भैय्या) मुंडे, उपाध्यक्ष चंद्रकांत कुलकर्णी, अतुल (दादा) मुंडे, बँकचे मुख्यकार्यकारी अधिकारी वसुदेवराव मुंडे, बँकेचे सर्व संचालक मंडळ, ठेवेदार, कर्जदार, हितचिंतक, बँकेचे सर्व कर्मचारी, पिग्मी प्रतिनिधी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

मराठी पत्रकार परिषदेच्या पुणे ते सेलू रॅलीचे आष्टीत जोरदार स्वागत

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या कार्याचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्याकडून कौतुक

आष्टी । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषद मुंबई व परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघ व सेलू तालुका मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श जिल्हा व तालुका पुरस्कार वितरण सोहळा व पत्रकार मेळावा दि १ फेब्रुवारी रोजी परभणी जिल्ह्यातील सेलू येथे आयोजित केला असून या कार्यक्रमाचे औचित्य साधून मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पुणे ते सेलू रॅलीचे आयोजन करण्यात आले होते ही रॅली आष्टी शहरांमध्ये येताच फटाक्यांची आतिषबाजी करत जोरदार स्वागत मराठी पत्रकार परिषद संलग्न आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले.

परभणी जिल्ह्यातील सेलू येथे होत असलेल्या पत्रकार मेळावा व पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्त पुणे ते सेलू रॅली शुक्रवार दि ३१ जानेवारी रोजी दुपारी तीनच्या दरम्यान शहरांमध्ये दाखल होताच फटाक्यांची आतिषबाजी करत तोफांची सलामी देत या रॅलीचे

मराठी पत्रकार परिषद सलग्न आष्टी तालुका युवा पत्रकार संघ मागील अनेक वर्षापासून सामाजिक कार्यात अग्रेसर असून पत्रकारितेच्या माध्यमातून विविध घटकातील नागरिकांना न्याय देण्याचं काम लेखणीच्या माध्यमातून स्थानिक पत्रकार बांधव करत आहेत तसेच विविध सामाजिक उपक्रम राबवत आहेत तेरा वर्षांपासून तालुक्यामध्ये दिनदर्शिका प्रकाशित करून मोफत वितरण करण्याचे काम ते अखंडपणे करत आहेत त्यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी यावेळी बोलताना काढले.

जोरदार स्वागत करण्यात आले स्वागतानंतर आष्टी शहरातील शासकीय विश्रामगृहामध्ये परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख सर, शरद पाबळे, सुनील लोणकर, गणेश मोकाशे, सुनील वाळुंज, भरत निगडे, तात्या शेलार, अनिल वडघुले, विनय सोनवणे, अविनाश आदक आदींसह परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ व मानाचा फेटा बांधून स्वागत करण्यात आले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष तथा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, सचिव जावेद पठाण, उपस्थित होते.

माईंड इंग्लिश स्कूल तलवाडा या शाळेचे वार्षिक संमेलनचे उद्घाटन मा श्री नरके साहेब यांच्या हस्ते संपन्न

शिक्षणाची कास सोडू नका : नरके

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील माईंड इंग्लिश वार्षिक संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना संबोधित करीत असताना सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे जिद्द चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन केले पाहिजे पुस्तकांनी मस्तक सुधारते आणि म्हणून जीवनात तुम्हाला किती अडचणी येऊ द्या परंतु तुम्ही शिक्षणाची कास सोडू नका असे आव्हान तलवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक माननीय श्री सोमनाथ नरके साहेब यानी केले आहे. त्याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश रावजी हात्ते साहेब. प्रमुख पाहुणे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक विजय डोंगरे सर माननीय श्री विजय पवार माननीय श्री श्रीमंत सानप मा श्री पांडुरंग चांडक माननीय श्री विकास कोकाटे माननीय श्री अर्जुन बारगजे सर माननीय श्री प्रमोद बोरकर सर सरपंच मा श्री विष्णू हात्ते तलवाडा चे उपसरपंच माननीय श्री आजु सौदागर.पत्रकार बापू गाडेकर पत्रकार अल्ताफ भाई कुरेशी पत्रकार आर आर आबा साहेबा कुराडे. दत्ताभाऊ हाते ह भ प गणेश महाराज कचरे रवी गांधले बाबुराव शिंगणे सुरेश चिकने सखाराम चिकणे डोंगरे सर माळी सर सगळे सर या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित महिला मंडळ युवक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते आलेल्या सर्व मान्यवरांचे इंग्लिश स्कूल शाळेचे संस्थापक अध्यक्ष माननीय श्री कावळे सर माननीय श्री पवार सर मा श्री हाते सर यांनी मानले.

खुनाच्या आरोपातून आरोपीची जामीन मंजूर : ॲड.सचिन काळे

बीड । प्रतिनिधी

डोक्यात दगड घालून जीव मारल्याच्या आरोपातून लिंबाजी कानडे याची जामीन मंजूर थोडक्यात माहिती अशी की,सय्यद मजहर सय्यद अख्तर वय ४२ वर्ष राहणार हवेली तांदळवाडी तालुका यांचे प्रियसी व तिच्यासोबत असलेला लिंबाजी लक्ष्मन कानडे व अज्ञात लोकांनी त्यास अनैतिक संबंधातून दगडाने ठेचून जीवे ठार मारले अशी फिर्याद शहर पोलीस स्टेशन येथे दिली होती तरी त्यास गु.र.नं २७०/२४ कलम १०३,३ (५) बी.एन.एस नुसार गुन्हा नोंद झाला होता सदर आरोपीने न्याय मिळवण्यासाठी ॲड.सचिन काळे यांच्या वतीने माननीय जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला आरोपी यांचे विकिल यांनी केलेला बचाव व युक्तिवाद इत्यादी बाबी ग्राह्य ग्राह्य धरून मा.जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला आरोपीच्या वतीने ॲड.सचिन काळे यांनी काम पाहिले त्यांना ॲड.पवन नागरगोजे यांनी सहकार्य केले.

नाटक हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते समाज परिवर्तन करण्याचे प्रभावी माध्यम : मंगेश रोटे

नेकनूर । प्रतिनिधी

नाटक हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते समाज परिवर्तन करण्याचे प्रभावी माध्यम आहे असे मत मंगेश रोटे यांनी येथील शासकीय अध्यापक विद्यालयातील नाट्य स्पर्धे वेळी व्यक्त केले.विद्यालयात प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते . यादरम्यान विद्यालयात नाट्य स्पर्धा ,मैदानी खेळ , रांगोळी स्पर्धा , चित्रकला स्पर्धा , निबंध स्पर्धा , सुंदर हस्ताक्षर स्पर्धा , गीत गायन

स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते . याचाच एक भाग म्हणून नाच्य स्पर्धेचे आयोजन प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्ष मराठी आणि उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी केले होते . यामध्ये समाजातील ज्वलंत समस्या ,चालीरीती , रूढी परंपरा जसे की , बालविवाह , मोबाईलचे दुष्परिणाम , शेतकरी आत्महत्या, मुलींचे शिक्षण हे विषय प्रभावीपणे मांडण्यात आले . यासाठी परीक्षक म्हणून ग्रामीण विद्यालयातील उपक्रमशील कलाध्यापक मंगेश रोटे व नेकनूर शहरातील गीतकार , संगीतकार तथा नाटककार अशोकजी चक्रे हे उपस्थित होते . वरील सर्व नाटकातून प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक काढण्यात आले. ' मुझे आजादी चाहिये ' हे नाटक प्रथम आले तर 'कोरोना ' हे नाटक द्वितीय आले तर तृतीय नाटक मोबाईलचे दुष्परिणाम यांनी बक्षीस पटकावले तसेच अभिनयामध्ये दादी नावाच्या पात्राने प्रथम क्रमांक , बालविवाह मधील पिता पात्राने द्वितीय क्रमांक , तर कोरोना मधील डॉक्टर पात्राने तृतीय क्रमांक पटकावला या यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान यावेळी प्रमुख प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला . वरील स्पर्धेसाठी विद्यालयातील प्राचार्य , डॉ .अब्दुल नजीब सर, प्राध्यापक पुजारी सर , धोडगे सर , पट्टेवार सर यांचे मार्गदर्शन लाभले . यावेळी सुत्रसंचलन विद्यालयतील मुलींनी केले तर आभार प्रदर्शन धोंडगे सर यांनी केले .